महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

*<u>कालमर्यादा – १२/०९/२०२४.</u>*
जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-४/पदोन्नती/२०२४/ 3737 दिनांक : 10 SEP 2024

**परिपत्रक :**

**विषय :- गट ड मधील पदे पदोन्नतीने भरणेबाबत..**

या कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थामधील **खाली नमूद केलेली गट ड मधील पदोन्नतीची पदे " ज्येष्ठता अधिन पात्रता "** विचारात घेऊन पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर पदासाठी वेतनश्रेणी व आवश्यक अर्हता खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | पदोन्नत पदाचे पदनाम व वेतनश्रेणी | ज्या संवर्गातून / पदामधून पद भरावयाचे आहे त्याचे पदनाम | आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ग्रंथपरिचर (वेतन स्तर – एस ६ : १९९०० – ६३२००) (०१पद) | गट ड | १) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.<br>२) ग्रंथालयात काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.<br>३) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |
| २ | प्रयोगशाळा परिचर (वेतन स्तर – एस ६ : १९९०० – ६३२००) (०२ पद) | गट ड | १) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र) या विषयांसह उत्तीर्ण.<br>२) प्रयोगशाळेत काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.<br>३) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |

तरी आपल्या संस्थेतील जे कर्मचारी वर नमूद केलेल्या पदोन्नतीच्या पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असतील त्यांची माहिती खालील प्रप्त्रामध्ये भरुन दिनांक **<u>१२/०९/२०२४ पर्यंत</u>** या कार्यालयास त्यांचे **अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह** सादर करावी.

| अ. क्र. | कर्मचा-याचे संपूर्ण नांव | पदनाम | वेतन श्रेणी (रुपये) | प्रवर्ग व जात | जन्म दिनांक | मूळ नेमणूक दिनांक | शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झाल्याच्या वर्षासह) | जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा कसे ? | शेरा / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

कर्मचा-यांचे संस्थेतील उपलब्ध अभिलेख व सेवापुस्तके यामधील नोंदींवरुन, तसेच कर्मचा-यांकडून त्यांची शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, दाखले इत्यादी घेऊन तपासावीत व माहिती या कार्यालयास सादर करावी.

संस्थेमध्ये मधील कर्मचारी उपलब्ध नसल्यास किंवा पदोन्नतीसाठी अर्ज करण्यास इच्छूक नसल्यास **'निरंक'** अहवाल सादर करण्यात यावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था प्रमुख यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याकरिता.

E:\EST 4\MyDocuments\Promotion (SSC).doc/118